सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २५० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ५ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## राहुल गांधींच्या 'हायड्रोजन बॉम्ब'ला निवडणूक आयोगाचे प्रत्युत्तर

### १५ मुद्दे मांडत सर्व आरोप फेटाळले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नवी दिल्ली**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी हरियाणा विधानसभा निवडणुकीत २५ लाख मतांची चोरी झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेतून त्यांनी मतदार याद्या दाखवत, एकाच व्यक्तीच्या नावे अनेक ठिकाणी मते पडल्याचा आणि बनावट नावांनी मतदार याद्या तयार केल्याचा आरोप केला. आता या सर्व आरोपांवर हरियाणा निवडणूक आयोगाची अधिकृत प्रतिक्रिया आली आहे.

काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'क ऋळश्रशी' नावाने पत्रकार परिषद घेत दावा केला की,




हरियाणामध्ये सुमारे २ कोटी मतदारांपैकी २५ लाख मतदार बनावट आहेत. म्हणजेच प्रत्येक ८ पैकी १ मत चोरी गेले आहे. त्यांनी पत्रकार परिषदेत काही मतदार याद्यांचे फोटो दाखवत, एकाच फोटोवर वेगवेगळ्या नावाने मतदारांची नोंद असल्याचा आरोप केला.

**निवडणूक आयोगाचे प्रत्युत्तर**

हरियाणा निवडणूक आयोगाने राहुल गांधींच्या आरोपांवर १५ मुद्द्यांत सविस्तर स्पष्टीकरण देत सर्व दावे पूर्णपणे निराधार असल्याचे म्हटले आहे. आयोगाने द वर पोस्ट करून राहुल गांधींचे दावे फेटाळले आणि सविस्तर माहिती दिली. आयोगाने स्पष्ट केले की, राहुल गांधींचे आरोप तथ्यहीन आहेत. निवडणुकीतील प्रत्येक प्रक्रिया (मतदार यादी तयार करणे, पडताळणी, आणि निकाल जाहीर करणे) पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने आणि सर्व पक्षांच्या देखरेखीखाली झाली आहे.

**मतदार यादीत एका महिलेचा फोटो २२३ वेळा आला**

राहुल म्हणाले, काही लोकांचे वय त्यांच्या फोटोपेक्षा वेगळे असते. दोन मतदान केंद्रांच्या मतदार यादीत एका महिलेचा फोटो २२३ वेळा दिसतो. ही महिला इतक्या वेळा का आली हे निवडणूक आयोगाला स्पष्ट करावे लागेल.राहुल गांधी यांनी यापूर्वी ७ ऑगस्ट आणि १८ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदा घेतल्या होत्या. १८ सप्टेंबर रोजी ३१ मिनिटांच्या सादरीकरणात राहुल यांनी कर्नाटक आणि महाराष्ट्रात मतचोरीचा आरोप केला आणि पुरावे असल्याचा दावा केला.

## मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यावर ऊसाच्या कांड्या फेकण्याचा प्रयत्न

### कोल्हापूर येथील घटना, ऊस दराचे आंदोलन चिघळले; पोलिसांची धावाधाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५कोल्हापूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ताफ्यावर बुधवारी कोल्हापुरात ऊसाच्या कांड्या फेकण्याचा प्रयत्न झाला. यामुळे कोल्हापुरातील ऊस दराचे आंदोलन अधिकच चिघळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील ८ कारखान्यांनी मागील हंगामाची एफआरपी थकवल्याचा आरोप माजी खासदार राजू शेट्टी यांनी केला होता. तसेच या प्रकरणी त्यांनी मुख्यमंत्र्यांना जाब विचारण्याचा इशाराही दिला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज कोल्हापूरच्या दौऱ्यावर आले असता उपरोक्त घटना घडली. यासंबंधीच्या माहितीनुसार, काही अज्ञात शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या रस्त्याने जाणाऱ्या ताफ्यावर ऊसाच्या कांड्या फेकण्याचा प्रयत्न केला. त्यांनी ऊसाच्या कांड्यांनी भरलेली पोती रस्त्यावर टाकून आपला निषेध नोंदवला. अचानक घडलेल्या या घटनेमुळे पोलिसांची एकच धावपळ उडाली. त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन ऊसाच्या कांड्या बाजूला केल्या.

**ऊस दराचे आंदोलन चिघळण्याची शक्यता**

गत काही दिवसांपासून ऊस दराच्या मुद्यावरून कारखानदार, शेतकरी संघटना व प्रशासन यांच्यात संघर्षाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यातच मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यावर ऊसाच्या कांड्या फेकण्याचा प्रयत्न झाल्यामुळे हे आंदोलन अधिकच चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या घटनेमुळे काही काळ पुणे - बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. विशेष म्हणजे ही घटना ज्या ठिकाणी घडली तिथे पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता. पण शेतकऱ्यांनी त्यांना कोणताही थांगपत्ता लागू न देता आपले काम फत्ते केले.

## मिर्झापूरमध्ये ट्रेनने ६ महिलांना चिरडले

### कार्तिक स्नानासाठी गंगा घाटावर जात होत्या ट्रॅक ओलांडताना अपघात झाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ मिर्झापूर**

बुधवारी उत्तर प्रदेशातील मिर्झापूर येथे कालका एक्सप्रेस ट्रेनने अनेक यात्रेकरूंना चिरडले. रेल्वेने सहा महिलांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो. अनेक लोक जखमी झाले आहेत. या घटनेमुळे स्टेशनवर घबराट पसरली. चुनार रेल्वे स्टेशनवर सकाळी ९:३० वाजता हा अपघात झाला.

जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातात मृत्युमुखी पडलेले बहुतेक यात्रेकरू वाराणसीतील कार्तिक पौर्णिमा तीर्थस्थळी जात होते. चुनार रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर हा अपघात झाला.सांगण्यात



येत आहे की- चोपनहून येणारी पॅसेंजर ट्रेन प्लॅटफॉर्म ४ वर आली. भाविक तिथे उतरले आणि रुळ ओलांडू लागले. ते प्लॅटफॉर्म ३ ओलांडून रुळावर येताच कालका एक्सप्रेस तिथून गेली. तिला थांबा नव्हता.भाविक निघून जाण्यापूर्वीच त्यांना ट्रेनने धडक दिली. त्यांच्या मृतदेहांचे तुकडे झाले. तथापि, रेल्वेने अद्याप मृतांच्या संख्येबाबत कोणतीही अधिकृत माहिती जाहीर केलेली नाही.प्रत्यक्षदर्शी भागीरथी म्हणाल्या, आम्ही सर्वजण खमारिया येथे राहतो. आम्ही चुनार येथील वाळू घाटावर आंघोळ करण्यासाठी जात होतो. आम्ही प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर चढत असताना अचानक एक ट्रेन आली आणि सर्वांनाच त्याची धडक बसली.

## बद्रीनाथ धाममध्ये बर्फवृष्टी, तापमान शून्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

उत्तराखंडमधील चमोली येथील बद्रीनाथ मंदिरात बुधवारी सकाळी नोव्हेंबर महिन्यातील पहिली बर्फवृष्टी झाली. संपूर्ण मंदिर परिसर बर्फाच्या पांढऱ्या चादरीने झाकला गेला होता, ज्यामुळे मंदिराचे एक विहंगम दृश्य निर्माण झाले.

हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे तापमान शून्य अंश सेल्सिअसपर्यंत खाली आले आहे. कडाक्याची थंडी आणि बर्फवृष्टी असूनही, भाविकांचा उत्साह अबाधित राहिला. जय बद्री विशाल! च्या जयघोषात भाविक भगवान बद्रीनाथाच्या दर्शनासाठी पोहोचले.

या वर्षी आतापर्यंत १.५९ दशलक्ष लोकांनी बद्रीनाथला भेट दिली आहे. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २:५६ वाजता बद्रीनाथचे दरवाजे हिवाळी हंगामासाठी बंद केले जातील.

हवामान खात्याच्या मते, येत्या काही दिवसांत उंचावरील भागात अधिक बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, स्थानिक प्रशासनाने यात्रेकरूंना सावधगिरी बाळगण्याचे आणि थंडीसाठी पूर्णपणे तयार राहण्याचे आवाहन केले आहे.बर्फाच्छादित बद्रीनाथ मंदिर पाहण्यासाठी पर्यटक आणि भाविक मोठ्या संख्येने येत आहेत.

## उद्धव ठाकरे घराबाहेर पडल्याचा आनंद...

### ठाकरेंचे विकासावर भाषण दाखवा अन् हजार रुपये मिळवा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५कोल्हापूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्याची खिल्ली उडवली आहे. उद्धव ठाकरे पहिल्यांदाच घराबाहेर पडलेत. त्याचा मला आनंद आहे. पण ते टोमणे मारण्यापलिकडे काहीही करू शकत नाहीत, असे ते म्हणालेत.

उद्धव ठाकरे आजपासून मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकावर शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप केला आहे. सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काढून घेण्यासाठी कर्जमाफीसाठी पुढील वर्षी जून महिन्याची तारीख दिली आहे, असे ते म्हणालेत. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी कोल्हापुरात पत्रकारांशी बोलताना त्यांच्यावर पलटवार केला आहे. उद्धव ठाकरे पहिल्यांदाच घराबाहेर पडले आहेत. त्याचा मला आनंद आहे. ते टोमणे मारण्यापलिकडे काहीच करू शकत नाहीत. तुम्ही मला त्यांनी विकासावर केलेले भाषण दाखवा आणि हजार मिळवा, असे ते म्हणाले.

**राज ठाकरेंवरही साधला निशाणा**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या कालच्या पत्रकार परिषदेवर टीका



केली होती. आयोगाची पत्रकार परिषद पाहून तळपायाची आग मस्तकात गेली असे ते म्हणाले होते. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या या टीकेचाही समाचार घेतला. राज ठाकरे यांना एकच उत्तर पाहिजे. ते म्हणजे निवडणुका पुढे ढकली. त्यांना दुसरे कोणतेही उत्तर अपक्षेति नाही. पण सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार निवडणुका पुढे ढकलता येत नाहीत. त्यामुळे त्यांना अपेक्षित उत्तर मिळू शकत नाही, असे ते म्हणाले.

**स्थानिक निवडणुकांत महायुतीचाच विजय**

मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत महायुतीचाच विजय होण्याचा ठाम विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, निवडणुकांची घोषणा झाली आहे. आम्ही त्या निवडणुकांना सामोरे जाऊ. आमचे तिन्ही पक्ष आपापल्या पातळीवर युतीच्या संदर्भात निर्णय घेतील. पण कोणत्याही परिस्थितीत आम्ही एकच आहोत. एखाद्या ठिकाणी युती झाली नाही, तर त्या ठिकाणी निवडणुकीनंतर युती होईल. त्यामुळे या नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील जनता मोठ्या प्रमाणात आमच्या महायुतीलाच कौल देईल.

उल्लेखनीय बाब म्हणजे विरोधी पक्षांनी गत दोन-तीन महिन्यांपासून मतचोरी व मतदारयाद्या स्वच्छ केल्यानंतरच निवडणउका घेण्याचा धोशा लावला आहे. विशेषतः काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी याविषयी सरकारला सळो की पळो करून सोडले आहे. पण त्यानंतरही राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बहुप्रतिक्षित निवडणुकांची घोषणा केली. यामुळे राज्याचे वातावरण चांगलेच तापले आहे.

## उद्धव ठाकरेंचा निवडणुकीसाठी दौरा, मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांना काय दिले? शिंदे गटाचा पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

शेतकऱ्यांची फसवणूक केली, ही उद्धव ठाकरेंची कॅसेट जुनी झाली, तीच रटाळ कॅसेट, तेच टेप लोकांना दररोज ऐकण्यामध्ये इंटरेस्ट नाही. मराठवाड्यात शेतकरी नुकसान झाले महायुती सरकारने मदत ही केली, उद्धव ठाकरेंचा हा दौरा निवडणुकीसाठी आहे. हे जेव्हा मुख्यमंत्री होते तेव्हा यांनी शेतकऱ्यांना काय दिले, अशी विचारणा शिवसेना शिंदे गटाचे



खासदार श्रीकांत शिंदे यांनी केली.

पत्रकारांशी बोलताना खासदार श्रीकांत शिंदे म्हणाले की, ओला दुष्काळ झाला तेव्हा ३६ हजार रुपयांचे पॅकेज या सरकारने दिले. या अगोदर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते तेव्हा एनडीआरएफचे निकष बाजूला ठेवून मदत देण्याचे काम आमच्या सरकारनेच केले. ज्यांनी काहीच केले नाही ते आज शेतकऱ्यांना येऊन बोलत आहेत, त्यांना बोलू द्या. शेतकऱ्यांना माहिती आहे, त्यांच्याबरोबर कोण उभे आहे, या शब्दांत श्रीकांत शिंदे यांनी पलटवार केला.

शेतकऱ्यांना सर्व योजनांचा लाभ मिळाला त्यामुळे विधानसभेला शेतकरी आमच्या मागे उभे राहिले. म्हणून महायुती सरकार पुन्हा निवडून आले. या दौऱ्याबद्दल काय म्हणायचे हे त्यांना विचारा, असेही ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांचा 'दगाबाज रे' शेतकरी संवाद दौरा सुरू झाला आहे. उद्धव ठाकरे यांनी अवकाळी पाऊस आणि नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी राज्य सरकारच्या भूमिकेवर तीव्र टीका केली.

## रणशिंग फुंकले...! आघाडी अन् युतीच्या संभ्रमामुळे इच्छुकांची झाली अडचण

### इच्छुकांचा मतदारांच्या गाठीभेटीवर जोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

गेल्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये बहुतांश ठिकाणी राजकीय पक्ष स्वतंत्रपणे लढले होते. मात्र, यावेळी पक्षफुटीनंतर परिस्थिती बदलली आहे. स्थानिक राजकारणावरही त्याचा परिणाम झालेला दिसतो. दुसरीकडे भाजपमध्ये अजूनही इनकमिंग सुरू आहे. त्यातच आता अमरावती जिल्ह्यातील १० नगरपरिषद आणि दोन नगरपंचायतींसाठी निवडणूक घोषित झाली असून, ही निवडणूक आघाडीत की युतीत लढवायची की स्वबळावर याचा कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे इच्छुकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल अखेर वाजले आहे. सुरुवातीला नगरपरिषद आणि नगरपंचायत यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. राज्यामध्ये महाविकास आघाडी किंवा महायुती जरी अस्तित्वात असली तरी मात्र स्थानिक पातळीवर



नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आघाडी किंवा महायुती कितपत सक्रिय राहील याविषयी मात्र साशंकता व्यक्त होत आहे. सध्या कोणत्याही पक्षाने स्थानिक पातळीवर स्वबळावर लढायचे की आघाडी करून लढायचे याबाबत कोणतेही संकेत दिले नाही. त्यामुळे इच्छुकांमध्ये आता काय करायचे असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. काहींनी दसरा-दिवाळीच्या मुहूर्तावर मतदारांच्या गाठीभेटीवर भर दिला होता, तो अजूनही दिसत आहे.

काही ठिकाणी आरक्षणाने गणिते बिघडवली आहे तर काही ठिकाणी इच्छुकांना भाजपमधील इनकमिंगमुळे पत्ता कट झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे अशा इच्छुकांनी काही दिवसांपासूनच अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निश्चित केले आहे. त्याअनुषंगाने त्यांच्या प्रचाराने जोर धरला आहे. या निवडणुकीमध्ये स्वबळावर सत्ता येऊशकते की नाही याची भाजपने चाचपणी सुरु केली आहे, पण सध्या तरी त्यात यश मिळणे अशक्य वाटत आहे.

**पक्षाऐवजी चेहऱ्यावर निवडणूक**

पक्षफुटीनंतर मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप तसेच भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेसला रामराम करत भाजपची वाट धरली आहे. त्यामुळे चेहरे जुनेच आहेत, पण पक्ष आता नवा आहे.

## खासदार मेधा कुलकर्णी रुग्णालयात दाखल पुणेकरांसाठी लिहिला खास संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५पुर्णे**

पुण्यातील राज्यसभेच्या भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे खासदार मेधा कुलकर्णी यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलंय. रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांच्यावर तातडीने उपचार सुरु करण्यात आले आहेत.



भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पुणेकरांना ही माहिती दिली. प्रकृतीत सुधारणा झाल्यावर लवकरच भेटू, असं म्हणत मेधा कुलकर्णी यांनी सोशल मीडियावर ही माहिती दिली आहे. त्यांना रुग्णालयात दाखल करताच त्यांचे समर्थक त्या बरे होण्यासाठी प्रार्थना करत आहेत.

'प्रकृती अस्वास्थ्यामुळे मी उपचारार्थ रुग्णालयामध्ये दाखल झाले आहे. त्यामुळे काही दिवस आपल्या संपर्कात नसेन. त्याबद्दल दिलगीर आहे.काही काम असल्यास आपण माझ्या कार्यालयाशी संपर्क करु शकता. प्रकृतीत सुधारणा झाल्यावर लवकरच भेटू, असे त्या पोस्टमध्ये म्हणाल्या आहेत. मेधा कुलकर्णी यांना नेमकं कोणत्या कारणासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं, याची सविस्तर माहिती मिळू शकलेली नाही.

## संपादकीय ......

# सावकारांच्या कर्जाचे आव्हान

अलीकडेच राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) प्रसिद्ध केलेल्या ग्रामीण धारणा सर्वेक्षण अहवाल २०२५ मध्ये ग्रामीण भारतातील कर्ज वितरण आणि त्यासंबंधी अडचणींवर काही अतिशय महत्त्वाच्या बाबी नमूद झाल्या. या अहवालातील पहिली महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भागात ५४.५ टक्के कुटुंबे आता केवळ औपचारिक स्रोतांद्वारेच (प्रादेशिक ग्रामीण बँका, सहकारी संस्था, सूक्ष्म वित्त संस्था इ.) कर्ज घेत आहेत. हा टक्का सर्वेक्षण सुरू झाल्यापासूनचा सर्वाधिक आहे. औपचारिक स्रोतांतून कर्ज देताना काही ठरावीक सरकारी नियम व व्याजदर लागू असतात, त्यामुळे शेतकर्यांना शोषणापासून संरक्षण मिळते.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे ग्रामीण भारतात औपचारिक कर्ज व्यवस्थेत सुधारणा झाली असली, तरी अजूनही अनेक कुटुंबे सावकार, नातेवाईक, मित्र व इतर अनौपचारिक स्रोतांवर अवलंबून आहेत. सुमारे २२ टक्के ग्रामीण कुटुंबे पूर्णपणे सावकारांवर आणि अनौपचारिक स्रोतांवर अवलंबून आहेत. या वर्गाकडून अजूनही १७-१८ टक्क्यांपेक्षा अधिक व्याजदराने कर्ज दिले जाते. अहवालात असेही नमूद आहे की २३.५ टक्के कुटुंबे औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही स्रोतांवरून कर्ज घेतात.

२०१९ मध्ये सुरू झालेली प्रधानमंत्री किसान सन्मान योजना ही लहान शेतकर्यांसाठी आर्थिक आधारस्तंभ ठरली. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ९.७ कोटींहून अधिक शेतकर्यांना २० हप्त्यांमध्ये ३.९ लाख कोटी रुपये देण्यात आले. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री स्वामित्व योजनेअंतर्गत ग्रामीण नागरिकांना त्यांच्या जमिनीचा कायदेशीर हक्क मिळवून देण्यात येत असून, त्यामुळे त्यांचे आर्थिक सशक्तीकरणाचे नवे पर्व सुरू झाले आहे. परंतु, अजूनही २२ टक्के ग्रामीण लोकसंख्या सावकार आणि अनौपचारिक स्रोतांवर अवलंबून आहे. त्यामुळे लहान शेतकर्यांची आर्थिक सुरक्षा धोक्यात येत आहे. जेव्हा या शेतकर्यांना उत्पन्नातील अस्थिरता, ऋतुमानिक जोखमी आणि सरकारकडून अपुर्या निधी हस्तांतरणाची समस्या भेडसावते, तेव्हा ते सावकारांच्या दाराशी मदतीसाठी पोहोचतात. व्याजदर प्रचंड असले तरी त्याशिवाय दुसरा पर्यायच या शेतकर्यांकडे उपलब्ध नसतो.

शेतकरी औपचारिक स्रोतांद्वारे कर्ज घ्यायचे ठरवतात; पण कागदपत्रांची कमतरता, हमीदारांचा अभाव आणि इतर कठीण अटींमुळे ते मागे हटतात. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या अहवालानुसार, सुमारे ५० टक्के कृषी कुटुंबे कर्जबाजारी आहेत. त्यांना संस्थात्मक बँकांबरोबरच गैरसंस्थात्मक स्रोतांवर म्हणजे सावकार व नातेवाईकांवर अवलंबून राहावे लागते. अनेकदा शेतकर्यांना जड व्याजामुळे मूळ रक्कम फेडता येत नाही आणि व्याजाचा भार कमी करण्यासाठी नव्याने कर्ज घ्यावे लागते. अशा रीतीने ते सावकारांच्या कर्जजाळ्यात अडकत जातात. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २०२४-२५ च्या वार्षिक अहवालानुसार, मार्च २०१० मध्ये ग्रामीण भागात ३३,३७८ बँक शाखा होत्या, तर डिसेंबर २०२४ पर्यंत हा आकडा ५६,५७९ वर पोहोचला आहे. सहकारी संस्थांचेही नवे जाळे उभे राहिले आहे. मात्र, सावकारांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी फक्त शाखा वाढविणे पुरेसे नाही. छोटे व अल्पमुदतीचे कर्ज प्रकल्प तयार करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील लघुउद्योग आणि उद्योजकांना विश्वासार्ह संस्थात्मक आर्थिक सेवा मिळाव्यात, यासाठी ठोस उपाययोजना कराव्या लागतील.

# नवीन विहीर, विहीर दुरुस्ती, बोअर खोदणे, शेततळ्यासाठी किती अनुदान मिळते, अशी आहे अर्ज प्रक्रिया




**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**

राज्य शासनाच्या 'बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना' तसेच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना' या दोन महत्त्वाच्या कृषी योजना आहेत. या माध्यमातून तुम्हाला नवीन विहिरीसाठी, विहिरीच्या दुरुस्तीसाठी तसेच बोअर खोदण्यासाठी अनुदान दिले जाते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

राज्यातील त्या त्या जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत ही योजना राबविली जाते. या योजनांचा उद्देश आदिवासी, अनुसूचित जाती प्रवर्गातील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. या योजनेचा लाभघेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करावा लागतो. संबंधित लाभार्थ्याला १०० टक्के अनुदान दिले जाते.

या घटकांसाठी मिळणार अनुदान

दोन्ही योजनांतर्गत शेतकऱ्यांना शेतीतील मूलभूत सोयीसुविधांसाठी आर्थिक मदत दिली जाते. यामध्ये नवीन विहीर बांधकाम, जुनी विहीर दुरुस्ती, शेतातील पाण्याचे प्लास्टिक आंतरसाठवण, सूक्ष्म सिंचन संच, सौर पंप, परसबाग, पाइपलाइन बसविणे, तराफा बांधकाम आणि शेती पंप (डिझेल/इलेक्ट्रिक) यांचा समावेश आहे. घटकानुसार शेतकऱ्यांना अनुदान मिळणार आहे.

घटकनिहाय असे मिळणार शेतकऱ्यांना अनुदान

योजनेंतर्गत घटक अनुदान

नवीन विहीर – ४ लाख रुपये

जुनी विहीर दुरुस्ती – १ लाख रुपये

शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण – २ लाख रुपये

सूक्ष्म सिंचन संच – ९० हजार रुपये

सोलर पंप – ५० हजार रुपये

परसबाग/इनवेल बोअरिंग/पंप संच – ८० हजार रुपये

बोअर खोदण्यासाठी ५० हजारांचे अनुदान

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत बोअरसाठी ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. हा घटक यावर्षी पहिल्यांदाच सुरू करण्यात आला आहे. शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन शासनाकडून बोअरसाठी अनुदान दिले जाणार आहे.

अर्ज प्रक्रिया व संपर्क माहिती

इच्छुक शेतकऱ्यांनी ारहरवलीं.ारहरीरीहींर.सीं.ळपया संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज सादर करावा. अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी गटविकास ३ अधिकारी, कृषी अधिकारी, पंचायत समिती किंवा कृषी विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली यांच्याशी संपर्क साधावा.

पात्रता व आवश्यक अटी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना अर्जदार अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध प्रवर्गातील असावा. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचा अर्जदार अनुसूचित जमातीतील शेतकरी असावा. दोन्ही योजनांसाठी अर्जदाराकडे स्वतःच्या नावावर किमान ०.४० हेक्टर ते कमाल ६.०० हेक्टर शेती असावी. अर्जदाराकडे जात प्रमाणपत्र, ७/१२ उतारा, आधार क्रमांक आणि बैंक खात्याची माहिती आवश्यक आहे.




## बोटांना आलेली सूज हलक्यात घेऊ नका! किडनी, हृदयाशी संबंधित आजाराचे संकेत

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**

बोटांमध्ये सूज येण्यामागे संधिवात, गाऊट, संसर्ग किंवा मूत्रपिंड, हृदयाशी संबंधित आजार असण्याची शक्यता असते. कारण, ओळखून योग्य उपचार केल्यास ही समस्या सहज नियंत्रणात आणता येते.



१. फ्लूड रिटेन्शन किंवा एडिम : बोटांमध्ये सूज येण्याचे सर्वात सामान्य कारण म्हणजे शरीरात पाणी धरून ठेवले जाणे. हे प्रामुख्याने जास्त मीठ खाणे, पाणी कमी पिणे, दीर्घकाळ उभे राहणे किंवा बसून राहणे यामुळे होते. महिलांमध्ये मासिक पाळीपूर्व काळात किंवा गर्भधारणेदरम्यान हार्मोनल बदलांमुळेही अशी सूज दिसते. सूज कायम राहत असेल, तर मूत्रपिंड, यकृत किंवा हृदयाच्या कार्यावर वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे.

२. संधिवात : वय वाढल्यास बोटांच्या सांध्यांची झीज होऊन ऑस्टिओआर्थरायटिसचा त्रास सुरू होतो. यात सांधे सुजतात, कडक होतात आणि वेदना होतात. रुमेटॉईड आर्थरायटिस हा ऑटोइम्युन आजार आहे. यात शरीराची रोगप्रतिकारक प्रणाली सांध्यांवरच हल्ला करते. सकाळी उठल्यावर बोटांमध्ये कडकपणा आणि सांध्यांभोवती उष्णता जाणवणे ही याची सुरुवातीची लक्षणे आहेत.

३. गाऊट : गाऊट हा संधिवाताचाच एक प्रकार असून तो शरीरात युरिक ॲसिडचे प्रमाण वाढल्याने होतो. हे ॲसिड सांध्यांमध्ये स्फटिकांच्या स्वरूपात साचून अचानक तीव्र वेदना, लालसरपणा आणि सूज निर्माण होते.

४. संसर्ग : काटे टोचणे, खरचटणे किंवा किड्यांच्या चाव्यांमुळे बोटांत जंतुसंसर्ग होऊ शकतो. अशा वेळी सूज, लालसरपणा, उष्णता आणि वेदना जाणवते. 'पॅरोनिकिया' किंवा 'सेलुलायटिस' यासारखे संसर्ग त्वचेमध्ये पू साचण्यास कारणीभूत ठरतात. योग्य वेळी उपचार न केल्यास हा संसर्ग रक्ताद्वारे शरीरभर पसरू शकतो. बोटांवरील सूज अनेकदा पडल्याने, ठेच लागल्याने किंवा फ्रॅक्चरमुळे येते.

गर्भधारणेदरम्यान शरीरातील रक्तप्रवाह वाढतो आणि हार्मोन्समुळे द्रव साठण्याची प्रवृत्ती वाढते. त्यामुळे बोटे, हात आणि पाय सुजतात. ही सूज विशेषतः शेवटच्या तिमाहीत अधिक दिसते. जास्त वेळ उभे राहणे किंवा बसून राहणे यामुळे ती वाढते. साधारण सूज निरुपद्रवी असते; परंतु अचानक वाढलेली सूज 'प्री-एक्लॅम्पसिया' या गंभीर स्थितीचे लक्षण असू शकते, म्हणून डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. हृदय, मूत्रपिंड किंवा यकृत नीट कार्य करत नाहीत, तेव्हा शरीरातील द्रव संतुलन बिघडते आणि सूज येते.

# राज्य सरकारकडून गरिबांना मिळणार २५ वर्षे मोफत वीज; काय आहे योजना? समजून घ्या

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**

गरिबीरेषेखालील बीपीएल व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांच्या घरांच्या छतांवर सोलर रूफटॉप बसवून त्यांना पुढील २५ वर्षे मोफत वीज दिली जाणार आहे. महावितरण कंपनीने स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप योजनेची (स्मार्ट) अंमलबजावणी सुरू केली आहे. राज्य सरकारने या योजनेसाठी ६५५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सुरुवातीच्या टप्प्यात ५ लाख ग्राहकांना या योजनेचा थेट लाभ मिळणार आहे.

महावितरणने सोमवारी दिलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने राज्य सरकारने ही 'स्मार्ट' योजना सुरू केली आहे. या योजनेचा उद्देश १.५४ लाख बीपीएल ग्राहकांचे वीज बिल पूर्णपणे समाप्त करणे हा त्याचप्रमाणे महिन्याला आहे. १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्या ३.४५ लाख ग्राहकांनाही याचा लाभ होणार आहे.ही योजना केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना'च्या धर्तीवर सुरू करण्यात आली आहे. सूर्यघर योजनेअंतर्गत ग्राहकाला १ किलोवॅट क्षमतेचा सोलर रूफटॉप बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून ३० हजार रुपयांचे अनुदान मिळते, तर उर्वरित खर्च ग्राहकाला करावा लागतो. स्मार्ट योजनेत केंद्राच्या अनुदानासोबतच राज्य सरकारकडून बीपीएल ग्राहकांना १७,५०० रुपयांची अतिरिक्त सबसिडी देण्यात येईल. त्यामुळे लाभार्थी अत्यंत कमी खर्चात आपल्या घरावर सोलर रूफटॉप बसवू शकतील आणि २५ वर्षे वीज बिलाच्या त्रासातून मुक्त होतील. त्याशिवाय अतिरिक्त वीज निर्मितीवरून उत्पन्न देखील मिळेल.




१०० युनिटपेक्षा कमी तीज वापरणाऱ्या सामान्य ग्राहकांना राज्य सरकार १० हजार रुपये, तर अनुसूचित जाती/जमाती) ग्राहकांना १५ हजार रुपयांची सबसिडी देईल. केंद्र सरकारकडून मिळणारे ३० हजार रुपयांचे अनुदान देखील यामध्ये राहील.

**योजनेला गती देण्याचे निर्देश**

महावितरणच्या आढावा बैठकीत या योजनेला गती देण्याचे निर्देश मुख्य अभियंत्यांना देण्यात आले आहेत. कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले की, केंद्र व राज्य सरकारच्या अनुदानामुळे ग्राहकांना अतिशय कमी खर्चात सोलर रूफटॉप बसविणे शक्य होईल.

**पीएम आवास योजनेतील लाभार्थ्यांनाही फायदा**

महावितरणने जाहीर केले आहे की 'स्मार्ट' योजनेचा लाभ प्रधानमंत्री आवास योजनांतर्गत असलेल्या लाभार्थ्यांनाही दिला जाईल. याअंतर्गत ग्राहक कुठेही सोलर रूफटॉप बसवून ग्रिड कनेक्टिव्हिटीच्या माध्यमातून ज्या ठिकाणी राहतात, तिथे वीज वापराचा लाभ घेऊ शकतील. नागपूर जिल्ह्यातील ३,६८९ ग्राहकांना याअंतर्गत लाभमिळणार आहे.

# कुटुंबव्यवस्था टिकवण्यासाठी मूल्य संस्काराची गरज- बाळकृष्ण आमले

## राज्यस्तरीय मराठा, कुणबी समाज युवक-युवती परिचय मेळावा उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती –** आकाशातील ग्रह ताऱ्यांचा मानवी जीवनावर परिणाम होत नाही. रास-कुंडली पाहून विवाह ठरवणे चुकीचे आहे. विवाहाचे वाढते वय ही आरोग्यविषयक समस्या बनली आहे.

लिंगनिदान प्रतिबंधक कायदा लागू होण्यापूर्वी गर्भजल परीक्षणाद्वारे कन्या भ्रूण नष्ट करण्याची प्रवृत्ती वाढल्याने मुलींची संख्या घटली आहे. जे मुलांच्या पालकांसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. घटस्फोटाचे जे आज प्रमाण वाढत आहे. यावर नियंत्रण आणण्यासाठी युवक-युवतींना मानसिक सजगता आणि कुटुंब मूल्यांची आवश्यक आहे. लग्नसंस्था व कुटुंबव्यवस्था




टिकवण्यासाठी उपयुक्त उपाययोजना व मूल्य संस्काराची गरज आहे, असे प्रतिपादन बाळकृष्ण आमले महाराज यांनी केले.

संत श्री वासुदेव महाराज ज्ञानपीठ अकोट, मध्यस्थी वधू वर सूचक मंडळ, विदर्भ वैभव मंदिर, मुंबई व कर्मयोगी संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय मराठा-कुणबी समाजाचा उपवधू-वर सूचक व पालक परिचय मेळावा अभियंता भवन, शेगाव नाका येथे उत्साहात पार पडला.

या वेळी मध्यस्थी वधू वर सूचक मंडळ शाखा अध्यक्ष बाळकृष्ण आमले, उद्घाटक बाळासाहेब फोकमारे, नंदकिशोर हिंगणकर, सुरेश कराळे, संजय बारब्दे, रवींद्र वानखडे, प्रा. प्रभाकर ठाकरे होते.

याप्रसंगी संत श्री वासुदेव महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या मेळाव्यात १३१ युवक- युवतींनी नोंदणी करून पालकांसमक्ष परिचय सादर केला. तसेच मध्यस्थी परिवाराने त्यांच्या भेटीगाठी घडवून आणल्या. कार्तिक शुद्ध एकादशीच्या औचित्याने उपस्थितांना फळे व चहा फराळ देण्यात आला. गजानन चऱ्हाटे यांनी युवक-युवतींच्या परिचय पत्रांचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उषा ठुसे यांनी केले, तर शांताराम उमाळे यांनी आभार मानले. या वेळी मध्यस्थी अमरावती शाखेचे उपाध्यक्ष दिलीप वाकोडे, डॉ. सुरेश चिकटे, किशोर राऊत व अन्य पदाधिकारी, सेवेकरी उपस्थित होते.

# वीज चोरी प्रकरणी ग्राहकांना ११ लाख ४८ हजाराचा दंड

## कुंभारगाव उपकेंद्रातील कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अंजनगाव सुर्जी –** दर्यापूर वीज वितरण कंपनी केंद्र अंतर्गत येत असलेल्या कुंभारगाव वीज वितरण उपकेंद्रात मागील काही वर्षात वीज चोरी ग्राहकांना ११ लाख ४८ हजाराचा दंड झाल्यामुळे वीज चोरी प्रकारात मोठा आळा बसला असून वीज चोरी करणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहे.

महावितरणच्या विद्युत तारावर हूक टाकून, मीटरमध्ये छेडछाड करून आणि घरगुती वीज कनेक्शन घेऊन व्यावसायिक वापर करण्याचे ५९ वीजचोरीचे प्रकार महावितरणच्या पथकाने उजेडात आणले. ही वीज चोरी ११ लाख ४८ हजार ११३ रुपयांची आहे, असे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. कुंभारगाव उपकेंद्रात वीज चोरीच्या घटना वाढल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. या तक्रारींनुसार महावितरणकडून विशेष भरारी पथके तयार केली होती. या पथकाने जुलै २०२१ ते सप्टेंबर २०२५ या पाच वर्षांच्या आर्थिक वर्षात मोठ्या प्रमाणात घरगुती व शेती वीज ग्राहकांनी विद्युत कनेक्शन घेऊन त्याचा मोठ्या प्रमाणात काही ग्राहकांनी वीज चोरीचा वापर केला होता. तसेच कुंभारगाव उपकेंद्रात एकूण ९ विद्युत तंत्रज्ञ व ४ विद्युत यंत्रचालक काम पाहतात या उपकेंद्रात एकूण १८ ग्रामीण भागातील गावे येतात. येथे मागील वर्षात नव्याने रुजू झालेले भूषण गावंडे कनिष्ठ अभियंता यांनी कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर असताना ड्रेस कोड घालण्याचा सूचना देऊन कर्मचाऱ्यांना शिस्तीचे धडे दिले. व वीज ग्राहकांच्या समस्या तात्काळ मार्गी काढाचे आदेश कर्मचाऱ्यांना दिले तसेच वीज ग्राहक समस्या कार्यालया प्रयत्न येऊं नये यासाठी कर्तव्यावर पुर्ण वेळ कर्मचाऱ्यांनी काढावा असे आदेश भूषण गावंडे कनिष्ठ अभियंता यांनी दिले आहे.ग्रामीण भागातील गावकऱ्यांमध्ये आपुलकीची भावना जोपासल्यामुळे कोणत्याही प्रकारची तक्रार वरिष्ठ कार्यालयाच्या दालनात दाखल होऊ दिली नाही हे विशेषतः असून कनिष्ठ अभियंता गावंडे यांनी २८० वीज मिटर नविन ग्राहकांना बसवून दिले आहे त्यामुळे वीज चोरी होण्याचा प्रकारांवर नियंत्रण आले आहे.कुंभारगाव वीज उपकेंद्रातील



कनिष्ठ अभियंता भूषण गावंडे यांची महावितरण कंपनने कामगिरी पाहून त्यांना उत्कृष्ट अभियंता म्हणून २०२५ मध्ये गौरविण्यात आले आहे.कुंभारगाव वीज उपकेंद्रा अंतर्गत येत असलेल्या नादुरुस्त वीज तार तात्काळ दुरुस्ती करून ग्राहकांचे समाधान होत आहे.-

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

बुधवार दि. ५ नोव्हेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# प्रचारासाठी मिळणार फक्त ५ दिवस२८ दिवसात पूर्ण होईल निवडणूक प्रक्रिया

## अपक्ष उमेदवारांना करावी लागणार तारेवरची कसरत

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५ अमरावती**

जिल्ह्यातील नगरपरिषदा आणि नगरपरिषदांच्या निवडणूक वेळापत्रकाची घोषणा झाल्याने इच्छुकांची दीर्घ प्रतीक्षा संपली. तथापि, जाहीर झालेल्या निवडणूक वेळापत्रकावरून संपूर्ण निवडणूक प्रक्रिया अवघ्या २८ दिवसांत पूर्ण होईल.

निवडणूक वेळापत्रकानुसार, २१ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. यामुळे २२ तारखेला उमेदवारांचे स्पष्ट चित्र तयार होईल. तथापि, जर एखादा उमेदवार अपक्ष राहिला तर त्याचे निवडणूक चिन्ह २६ नोव्हेंबर रोजी वाटप केले जाईल. यामुळे उमेदवारांना २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीची तयारी करण्यासाठी फक्त पाच ते सहा दिवस प्रचारासाठी भेटतील. निवडणूक आयोगाने जाहीर



केलेल्या वेळापत्रकानुसार, मतदारयादी ७ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. १० नोव्हेंबर रोजी अधिसूचना जारी केली जाईल, त्यासोबतचनामांकन प्रक्रियेची सुरुवात होईल. १७ नोव्हेंबरपर्यंत नामांकन अर्ज करता येतील. २२ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल. २ डिसेंबर रोजी मतदान होईल. दुसऱ्या दिवशी मतमोजणी होईल आणि निकाल जाहीर केले जातील. याचा अर्थ असा की, आज, ४ नोव्हेंबर रोजी जाहीर झाल्यापासून २८-३० दिवसांच्या आत निवडणूक पूर्ण होईल.

### बनावट जन्म-मृत्यू दाखल्याचे प्रकरण

# मनपाच्या आरोग्य विभागातील लिपिक निलंबित

**:विदर्भ प्रजासत्ताक दि.५ अमरावती** - अमरावती महापालिकेतील बनावट जन्म मृत्यू दाखल्यांसदर्भात महापालिका आयुक्तांनी मनपा आरोग्य विभागातील कनिष्ठ लिपिक शक्ती रंजीत घोगले याला तडकाफडकी निलंबित केले आहे.



शक्ती घोगले यांची २६/०५/२०२५ चे आदेशानुसार कनिष्ठ लिपीक पदावर नेमणूक झालेली होती. त्यांना महापालिकेच्या आरोग्य विभागात पदस्थापना देण्यात आलेली आहे. आरोग्य विभाग अंतर्गत जन्म-मृत्यु विभागातील कामकाजाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आलेली होती. त्यानुसार जन्म मृत्यु प्रमाणपत्रासंबंधीत काम रितसर करणे आवश्यक होते. शक्ती। रंजीत घोगले यांच्यासंबंधी प्रसारित झालेल्या जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत ऑडीओ क्लिप संदर्भात त्यांना कार्यालयाने । १४ ऑगस्ट २०२५ रोजी (पत्र क्र. अमनपा/साआवि/२९३/२०२५) कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्यावर त्यांनी दि. १९/०८/२०२५ रोजी सादर केलेला खुलामा असमाधानकारक होता. त्यांनी कर्तव्याप्रती सचोटी । राखली नाही. त्यांनी महाराष्ट्र नागरी मेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ (१) (२) (३) चा भंग केला आहे, । असा ठपका ठेवत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) । नियम १९७९, नियम ४ च्या पोट नियम (एक) अन्वये महापालिका आयुक्त सौम्या शर्मा- चांडक यांनी कनिष्ठ लिपिक -शक्ती रंजीत घोगले यांना तात्काळ निलंबीत केलेले आहे.

शक्ती रंजीत घोगले यांचे निलंबन कालावधीतील- मुख्यालय झोन क्र. ५ येथे राहील. त्यांना पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच कोणताही खाजगी व्यवसाय, धंदा करता येणार नाही. निलंबनकाळात नियमाप्रमाणे वेतन व भत्ते अनुज्ञेय राहील, असे मनपा आयुक्तांनी आदेशात नमूद केले आहे.

# टीईटी निर्णयाविरोधात ९ नोव्हेंबरला मूक मोर्चा

## पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती-** शिक्षक पात्रता परीक्षा टीईटीसंदर्भात शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने ९ नोव्हेंबरला रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षकांचा मूकमोर्चा काढण्याचे निश्चित केले आहे.

शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठीमहाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने या मूक मोर्चाचे आयोजन केले आहे. राज्यातील सर्व शिक्षकांनी मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होऊन मोर्चा यशस्वी करावा, असे आवाहन मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस राजेश सुर्वे यांनी केले आहे. अमरावती येथे ९ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता ईर्विन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मूक मोर्चा काढण्यात येणार आहे.

या मोर्चात प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अमरावती जिल्हा समन्वय शिक्षक समितीने केले आहे.

### प्रमुख मागण्या

टीईटी परीक्षा रद्द करा, या प्रमुख मागणीसह शिक्षण सेवक पद्ध पद्धत रद्द करण्यात यावी, १५ मार्च २०२४चा संच मान्यता शासन आदेश रद्द करण्यात यावा. जुनी पेन्शन योजना लागू करा. सर्व ऑनलाइन कामे रद्द करा, राज्यातील सर्व विषय शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. वस्तीशाळा शिक्षकांची मूळ सेवा ही सेवासातत्यासाठी गृहीत धरण्यात यावी.

# सहा हजारांवर मतदारांची नावे दोन, तीन अन् चार वेळा !

## मतदारयादीतील दुबार नावे सर्वत्र मोठा गोंधळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

६६८९ मतदारांच्या नावाची तब्बल १३५१३ वेळा नोंद असल्याचे उघड झाले आहे. विशेष म्हणजे ही नावे दुबारच नाही तर तिबार आणि कळस म्हणजे काही नावे चार वेळा मतदार यादीत असल्याचे समोर आले आहे. राज्य निवडणूक आयोगाने २९ ऑक्टोंबर रोजी मतदारयादीतील ३ बार नावांबाबत उपाययोजनांसाठी मार्गदर्शन सूचना दिल्या आहेत. त्यानुसार ५वरी१८२३. या प्रणालीवर दुबार रिपोर्ट टॅबनुसार ही दुबार नावे (**) अशी चिन्हांकित केली आहे.

निवडणुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या मतदारयादीत नवीन नावे समाविष्टकरणे, नावे वगळणे तसेच त्यामध्ये दुरुस्ती करण्याचे करण्याचे अधिकार



राज्य निवडणूक आयोग तसेच यानिवडणुकांसाठी प्राधिकृत केलेल्याअधिकाऱ्यांना नाहीत. मत्र मतदारयादी बिनचूक पाहिजे, यासाठी आयोगाने काही मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. त्यानुसार लॉगिन आयडी व पासवर्डचा वापर करून दुबार रिपोर्टवर क्लिक केल्यानंतर एकापेक्षा अधिकवेळा आल्याची यादी तपशिलांसह निवडणूक विभागाला मिळते. यामध्ये दुबार नावे चिन्हांकित करण्यात आलेली आहे व या मतदारांचे नाव, लिग, पत्ता व छायाचित्र याची आता प्राथमिक तपासणी केल्या जाणार मतदारयादीत किती मतदारांची नावे असल्याची माहिती आहे.

### हमीपत्र दिल्यास होणार मतदान

यादीतील दुबार मतदारांच्या प्राथमिक तपासणीत त्यांना कुठे मतदान करावयाचे आहे, याची माहिती घेतली जाणार आहे व त्यांनी प्रतिसाद न दिल्यास दुबार मतदार म्हणून यादीत तशी नोंद केल्या जाईल. सदर मतदार मतदानाला आल्यावर कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार, याबाबत अर्ज भरून घेतला जाईल व तेथे हमीपत्र दिल्यानंतरच त्याला मतदान करता येणार आहे.

### यादीत अशी आली दुबार नावे ?

मतदार नोंदणीचे वेली काही मतदारांनी ऑफलाइन नमुना अर्ज दिला, तर त्याच मतदाराने ऑनलाइनदेखील मतदार नोंदणी केली. शिवाय राजकीय पक्षाच्या कार्यकत्यांनीही या मतदाराची नमुना अर्ज भरून नोंदणी केल्याने यादीत दुपार, तिबारनावे आल्याची माहिती आहे. अशा मतदारांकडून हमीपत्र घेतल्यानंतर मतदानाची अनुमती दिल्या जाणार नाही. ६,५६६ मतदारांच्या नावांच्या दुबार नोंदीनुसार मतदार यादीत १३,१३२ नोंदी आहेत. तर १११ मतदारांच्या नावांच्या तिबार नोंदीनुसार मतदारयादीत ३३३ नोंदी आहेत. १२ मतदारांच्या नावांच्या चारवेळा नोंदीनुसार मतदारयादीत ४८ नोंदी आहेत.

# नगराध्यक्षपद ओबीसी महिलासाठी राखीव

## नेतेमंडळींची उमेदवारीसाठी धावपळ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.५धामणगाव रेल्वे**

धामणगाव रेल्वे नगरपंचायतीच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पद महिलेकरिता राखीव जाहीर होताच शहरातील राजकारणात चांगलीच खळबळ उडाली आहे. अनेकजण आपल्या अर्धांगिनींना उमेदवारी मिळावी याकरीता नेतमंडळींकडे धावपळ करतानाचे चित्र दिसून येत आहे.

नगराध्यक्ष पदाचं आरक्षण महिला वर्गासाठी झालं आणि लगेचच पक्षांच्या कार्यालयात 'पत्नी उमेदवार मोहीम सुरू झाली. काही ठिकाणी नेते स्वतः प्रचार करतात, पण यंदा असे दिसत आहे की, पत्नींसाठी तेच पती आता 'कार्यकर्ते' बनले आहेत. पक्षाच्या बैठकीतही एक नवा ट्रेंड दिसू लागला आहे. नेते महोदय बसलेले आणि बाजूलाच तिकीट मिळालं का गं? अशी पुटपुट चालू. शहरात सध्या या सगळ्या हालचालींमुळे लोकांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य आहे. या निवडणुकांना घेऊन चहाटपरी आणि हॉटेल,बार, रेस्टारेन्ट आदी ठिकाणी चर्चा रंगू लागल्या आहेत. दुसरीकडे काही पक्षांतील महिला आघाडीतील निष्ठावंत कार्यकर्त्या मात्र ठाम आहेत. आम्ही वर्षांनुवर्षे पक्षासाठी धावलो, झेंडे फडकवले, प्रचार केला. आता घराणेशाही नको, खऱ्या कार्यकर्त्या महिलेलाच संधी मिळाली पाहिजे, हा त्यांचा अट्टाहास पाहता अशी शाब्दिक झुंज सुरू झाली आहे. पक्षांतर्गत समीकरणे आणि वरदहस्ताचे हिशोब चालूच आहेत. काही नेते वरिष्ठांकडे चकरा मारतात तर काहींच्या गाड्या दिवसरात्र ठराविक बंगल्याबाहेर उभ्या दिसतात. शेवटी सर्वांचं लक्ष आता एका प्रश्नावर खिळलं आहे ते म्हणजे, नगराध्यक्ष पदाची खुर्ची कोणाच्या वाट्याला येणार? नेत्यांच्या अर्धांगिनी, की निष्ठावंत महिला कार्यकर्त्या ? सध्या तरी धामनगांव रेल्वेत पती प्रचारात, पत्नी स्पर्धेत अन् जनता तमाशात असे वातावरण रंगलेले दिसत आहे.

# चालकाचे नियंत्रण सुटले, शिवशाही बस चढली दुभाजकावर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५ तिवसा-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळची गणेशपेठ नागपूर आगाराची शिवशाही बस (एम. एच.९.एम १२९३) तळेगावहून अमरावतीमार्गे अकोला जात असतांना गुरुकुंज मोझरी येथून काही अंतरावर असलेल्या शेंदोळा खुर्द, जवळ अचानक चालकाचे नियंत्रण सुटल्याने शिवशाही बस थेट रस्ता दुभाजकावर चढली. ही घटना मंगळवारी (ता. चार) सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली. सुदैवाने यात शिवशाही बसमधील सर्व प्रवासी चालक व वाहक, सुखरूप असून कुठलीही जीवितहानी झाली नाही.नागपूर आगारातून तळेगाव,



अमरावतीमार्गे अकोला, शिवशाही बस नियमित फेरी घेऊन मंगळवारीनिघाली. सकाळी १० वाजताच्या सुमारास शेंदोळा खुर्द गावाजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस राष्ट्रीय महामार्गालगतच्या दुभाजकावर चढली. यात बसचे मोठे नुकसान झाले. बसचे समोरील ॲक्सल तुटले व बसच्या समोरील भागाचे चाकही निखळले होते. मात्र सुदैवाने बस मधील प्रवासी, चालक व वाहक कुणीही जखमी झाले नाही. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अधिक तपास पोलीस करीत आहे.

# महापालिकेला लागू होणार नाही मनपा अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती-** राज्यातील २४६ नगरपालिका, ४२ नगरपंचायतींची निवडणूकीसाठी आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे. पण ही आचारसंहिता अमरावती महापालिकेला लागु होणार नाही असे मनपा अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे अमरावती महापालिकेच्या अनेक नवीन कामे होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतींची निवडणूकीची घोषणा झाल्यापासुन आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकीसाठी २ डिसेंबरला मतदान आणि मतमोजणी ३ डिसेंबरला होणार आहे. या निवडणुकीची आचारसंहिता अमरावती महापालिकेला लागू होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. आचारसंहिता पालिकेला लागू झाली असती तर अनेक नवीन कामांच्या निविदा आणि कामे रखडली असती. पण या निवडणुकीची आचारसंहिता संबंधित नगरपालिका आणि नगरपंचायती क्षेत्रापुरती आहे. त्यामुळे अमरावती महापालिकेला या निवडणुकीची आचारसंहिता लागु होत नाही. या संदर्भात मनपा अधिकाऱ्यांना विचारले असता ते म्हणाले, या संदर्भात राज्याच्या सचिवाकडे विचारणा केली. त्यावर नगरपालिका, नगरपंचायतींची निवडणूकीसाठीची आचारसंहिता पालिकेला लागू होणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# मेलघाटच्या दुर्गम भागात विकासाचा महामार्ग सुरू होणार

## आवश्यक बजेटची तयारी करण्याचे जिल्हाधिकारी यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती :**मेलघाटमधील खुटीडा, एकताई, सिमोरी आणि हातरू या दुर्गम भागांमध्ये रस्ते, वीज आणि पुलांच्या कामांना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी हिरवा कंदील दाखवला आहे. या भागातील रस्त्यांचा तातडीने विकास सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक बजेटची तयारी करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

मेलघाटच्या नागरिकांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर केले होते. त्यानंतर ग्रामीणांसोबत चर्चा आयोजित करण्यात आली. या बैठकीत उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपवनसंरक्षक अर्जुना के. आर., किती जमदाडे तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.



जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले की, खुटीडा ते सिमोरी आणि सोमिथा ते खुटीडा या मार्गांच्या कामांना प्राधान्य दिले जाईल. रस्ता बांधणीसाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून पर्यायांचा ही विचार करण्यात येईल. हातरू ते करंजखेड या मार्गावरील संपर्क तुटण्याची समस्या सोडवण्यासाठी पुल उभारला जाईल. यासाठी सुमारे १५ कोटी रुपयांचा निधी शासनाकडून मागविण्यात येणार आहे.

वीज समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी जरिदा उपकेंद्रामार्फत २२ गावांना वीज पुरवठा सुनिश्चित केला जाणार आहे. वीज नसल्यामुळे मोबाईल नेटवर्कही बाधित होते, यावरही उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. आदिवासी भागातील मका खरेदीची जबाबदारी आदिवासी विभागाकडून सुनिश्चित करण्यात येणार आहे. सर्व कामांसाठी शासन स्तरावर तात्काळ कारवाई केली जाईल.

# खोटी कामे दाखवून रोजगार सेवकाने जमविली कोट्यवधींची माया?

## स्वतःच्या व इतरांच्या नावाने प्लॉटची खरेदीकामे न करताच काढलीत लाखोंची बिले

## छत्रपती पटके यांच्या आरोपांनी खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नांदगाव पेठ–**
रोजगार हमी योजनेंतर्गत विकासकामे दाखवून लाखो रुपयांची बिले काढणाऱ्या रोजगार सेवक संकेत चापके यांच्यावर कोट्यवधी रुपयांची माया जमविल्याचा आरोप होत आहे. रोजगार हमी योजना जिल्हा समितीचे सदस्य तथा ग्रामपंचायत सदस्य छत्रपती पटके यांनी गावातील असे अनेक प्रकरणे चव्हाट्यावर आणल्यामुळे संकेत चापके यांनी गैरव्यवहारातून कोट्यवधी रुपये लाटून शासनाला चुना लावल्याचे स्पष्ट झाले आहे.संकेत चापके यांनी केवळ स्वतःच्या नावावरच नव्हे तर इतरांच्या नावेही प्लॉटची नोंद करून प्रचंड संपत्ती जमवली असल्याचा आरोप पटके यांनी केला आहे. सरकारी नोंदीत विकासकामे व्यवस्थित पूर्ण न झाल्याचे स्पष्ट असूनही लाखो रुपयांची बिले काढण्यात आली आहेत. कामे प्रत्यक्षात केलीच नाहीत, मात्र बिले काढून पैसा खिशात घातला गेला, असा थेट आरोप छत्रपती पटके यांनी केला होता. त्या अनुषंगाने नांदगाव पेठ मधील अनेक श्रीमंतांना मजूर दाखवून शासनाकडून लाखो रुपये उकळले गेले. मागील दहा वर्षात एक कोटी पेक्षा अधिक रुपयांची अवैध संपत्ती केवळ एका रोजगार सेवकाने जमविली असून ही बाब अत्यंत गंभीर आहे. रोजगार हमी योजनेतील अधिकारी ते ग्रामपंचायत मधील अधिकारी




अशी सर्वांची ही चैन असून एकमेकांच्या सहकार्याशिवाय हा आर्थिक गैरव्यवहार झाला नसल्याचे सिद्ध होते. छत्रपती पटके यांच्यासह अनेकांनी संकेत चापके विरोधात तक्रारी दिल्या मात्र आजवर कोणत्याच तक्रारीची दखल घेण्यात आली नाही हे विशेष! रोजगार हमी योजनेतील निधी हा शेतकरी व श्रमिक वर्गाच्या विकासासाठी असताना त्याचाच अपहार झाल्याचा आरोप होत असल्याने नागरिकांमध्ये देखील संतापाची लाट उसळली आहे.या आरोपांमुळे चापके यांच्या कारभारावर चौकशीची मागणी जोर धरू लागली असून आर्थिक गुन्हे शाखेकडे देखील हे प्रकरण जाण्याची दाट शक्यता आहे.

### अवैध संपत्तीची चौकशी व्हावी–पटके

रोजगार सेवक संकेत चापके अत्यंत सामान्य परिस्थितीमधून असल्यानंतर सुद्धा मागील दहा वर्षात कोट्यवधी रुपयांची संपत्ती कशी गोळा केली, एकट्या रोजगार सेवकाने जर कोट्यवधी रुपयांची कमाई केली असेल तर याला संलग्नित असलेल्या अधिकाऱ्यांनी सुद्धा किती माया गोळा केली असेल हे तपासणे अत्यंत आवश्यक आहे.या रोजगार सेवकाने गावातील अन्य नागरिकांचे कागदपत्र लावून बँकेत खाते उघडून मजुरांच्या नावावर आलेला पैसा स्वतः हडप केला. पर्यायाने अनेक गरजू मजुरांचे पैसे लाटून स्वतः कोट्यवधी बनलेल्या रोजगार सेवकाची आर्थिक गुन्हे शाखेकडून तपास व्हावा तसेच कायदेशीर कार्यवाही करून अवैधरित्या कमावलेली संपत्ती शासनाच्या तिजोरीत जमा करावी अशी मागणी रोजगार हमी योजनेचे जिल्हा सदस्य छत्रपती पटके यांनी केली आहे.

## भातकुली पंचायत समितीत आयोजन

# समृद्ध पंचायत राज अभियान प्रचाराचा शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५भातकुली –** भातकुली पंचायत समिती येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यक्रमाचा शुभारंभ आ राजेश वानखडे आमदार तिवसा विधानसभा मतदार संघ) यांचे अध्यक्षतेखाली पार पडला.
, यावेळी सुनील राणा, प्रीती देशमुख (प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अमरावती, बाळासाहेब बायस (उपमुख्यकार्यकारी अधिकारी पंचायत),. तुषारदांडगे (गटविकास अधिकारीपंचायत समिती भातकुली). सुनील गवई सहा. गटविकास अधिकारी, प्रवीण वानखेडे सहा. गटविकास अधिकारी, सोपन गुडघे हे उपस्थित होते. मुखमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान प्रचार व प्रसिद्धीचे अनुषंगाने यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. पंचायत समिती भातकुलीमार्फत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत नियुक्त करण्यात आलेले नोडल अधिकारी यांनीतयार केलेले कलापथक व त्या माध्यमातून दिलेला अर्थपूर्ण संदेश मनाला भावला असे मत व्यक्त केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत जनजागृती करिता तयार करण्यात आलेल्या रथाला आमदार राजेश वानखडे यांनी हिरवी झेंडी दाखवली. बाळासाहेब बायसयांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक, तुषार दांडगे (गटविकास अधिकारी) यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन पवन ढोमणे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रल्हाद यांनी केले.

# अळणगाव घरफोडी प्रकरणाचा पोलिसांनी केला उलगडा

## दोन चोरटे गजाआड, ६८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ नांदगाव पेठ**
नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या सतर्क आणि अचूक तपासामुळे अळणगाव पुर्नवसन परिसरात झालेल्या घरफोडी प्रकरणाचा अवघ्या काही दिवसांत उलगडा करण्यात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन सराईत चोरट्यांना अटक करून सुमारे ६८,५०० मुद्देमाल जप्त केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २६ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर दरम्यान अळणगाव पुर्नवसन येथील पंजाबराव गुलाबराव दुर्गे यांच्या राहत्या घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केली होती. घरातील ४३,००० रोख रक्कम, ४ ग्रॅम सोन्याचे टॉप्स, ३ ग्रॅम सोन्याची साखळी अंदाजे किंमत २५,००० आणि चांदीचे तोरडे किंमत रु.५०० असा एकूण ६८,५०० किमतीचा ऐवज चोरून नेण्यात आला होता. या प्रकरणी गुन्हा क्र. ३८०/२०२५ कलम ३८०, ४५७ बीएनएस नुसार नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याच्या तपासासाठी स्वतंत्र



पथक तयार करून गोपनीय माहिती,सीसीटीव्ही फूटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्यातील आरोपींचा शोध लावत दोन आरोपींना शिताफीने अटक केली. यामध्ये ईजानोमुद्दीन हकीमोद्दीन पठाण (वय २० वर्षे, रा. ईनला, ता.जि. अमरावती) सोहेल उर्फ सोनू खान शमी खान (वय २४ वर्षे, रा. लालखडी, अमरावती) या दोन्ही आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली साधने तसेच मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. प्राथमिक चौकशीत आरोपींनी इतर काही चोरीच्या घटनांमध्येही सहभाग असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून, पुढील तपास सुरू आहे.ही यशस्वी कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१) गणेश शिंदे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदगाव पेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोहेकॉ राजाभाऊ राऊत, पोकों वैभव तिखिले, राजीक खान, शोएबुद्दीन सैयद आणि निलेश साविकार यांनी केली.या उत्कृष्ट कामगिरीबद्दल नागरिकांनी नांदगाव पेठ पोलिसांचे अभिनंदन केले असून, पोलिसांच्या तत्परतेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा आणि विश्वासाचा भाव अधिक दृढ झाला आहे.

# स्मार्ट मीटरविरोधात संतापाची लाट, नागरिकांचा वीज वितरण कार्यालयावर घेराव

## तात्काळ मीटर बदलण्याची मागणी; आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नांदगाव पेठ**
नांदगाव पेठ मध्ये काही महिन्यांपूर्वी वीज वितरण कंपनीतर्फे जबरदस्तीने बसविण्यात आलेल्या स्मार्ट मीटरमुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. या मीटरमुळे वीज बिलात झालेली प्रचंड वाढ आणि वीज कर्मचाऱ्यांची अरेरावीची वागणूक यामुळे आज संतप्त नागरिकांनी वीज वितरण कार्यालयावर धडक देत कार्यालयाला घेराव घातला. गावातील अनेक घरांमध्ये




जिनियस कंपनीचे स्मार्ट मीटर बसविण्यात आले असून, यापूर्वी एक हजार रुपयांच्या आसपास बिल येणाऱ्या ग्राहकांना आता चार ते पाच हजार रुपयांचे बिल येत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

हे मीटर चुकीचे आहेत; कंपनी आणि वीज वितरण मंडळ मिळून ग्राहकांची फसवणूक करत आहे, असा आरोप नागरिकांनी केला.तक्रारीनंतरही वीज वितरण अधिकाऱ्यांनी कोणतीही दखल घेतली नसल्याचा आरोप करत नागरिकांनी आज कार्यालयात मोठ्या संख्येने गर्दी केली. काही कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांशी अरेरावीच्या भाषेत वागणूक देण्यात येत असल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला. यावेळी अभियंता गजानन बेहरे यांना निवेदन सादर करून नागरिकांनी स्मार्ट मीटर तातडीने बदलण्याची मागणी केली. स्मार्ट मीटर लगेच बदलले नाहीत, तर ग्रामस्थ रस्त्यावर उतरतील आणि तीव्र आंदोलन करतील असा इशारा अमोल व्यवहारे, संजय इंगळकर, पंजाबराव सुंदरकर, नामदेव इंगोले, संदीप दुधे, ज्ञानेश्वर राऊत, सुनील जवके आणि रमेश जवके यांच्यासह नागरिकांनी दिला आहे.नागरिकांच्या या तीव्र आंदोलनामुळे वीज वितरण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, स्मार्ट मीटरचा वाद आता अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

## अनिल अग्रवाल यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात सोहम चा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती–** दै. अमरावती मंडल व दै. आपली मातृभूमीचे संपादक तथा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिलभाऊ अग्रवाल यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्य पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार अयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी पत्रकार मंगेश तायडे यांचेसुपुत्र सोहम याची युवक व क्रीडा संचनालय अंतर्गत जिल्हास्तरीय तसेच प्रोजेक्ट महादेवा अंतर्गत ट्रायल करिता निवड झाल्याबद्दल पोलीस आयुक्त अरविंद



चावरीया, खा.डॉ. अनिल बोंडे,संपादक अनिल अग्रवाल यांच्या हस्ते शाल व सन्मानचिन्ह देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील असंख्य पत्रकार कुटुंब या अभिष्टचिंतन सोहळ्याला उपस्थित होते.या निमित्याने सोहमचे सर्वच स्तरावरून अभिनंदन होत आहे.

# कर्जमाफीच्या जिल्हा बँकेत होणार स्वतंत्र सभा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५अमरावती,** –कर्जमाफीचा ठराव घेण्याकरिता यावर आधी चर्चा प्रस्ताव तैयार होणे गरजेचे आहे. त्यामुळे वेळेवर आलेल्या कर्जमाफीच्या मुद्यावर विरोधकांनी स्वतंत्र सभा घेण्याची मागणी केली. त्यामुळे अध्यक्षांनी स्वतंत्र सभेला परवानगी दिली आहे. याशिवाय काही कंत्राटी कर्मचारी भरण्यावर विरोधकांनी आक्षेप घेतला. जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाचीबैठक मंगळवारी पार पडली. सभेला अध्यक्षबच्चू कडू, उपाध्यक्ष अभिजितढेपे आदींसह संचालक मंडळ उपस्थित होते. यावेळी विविध ३२ विषयांवर सभेत चर्चा करण्यात आली. यातील काही मुद्यावर विरोधकांनी




आक्षेप नोंदविला तर काही विषयमंजुर करण्यात आले. राज्यातीलसर्व जिल्हा बँकांची एकाचवेळी कर्जमाफीचा

ठराव घेण्याच्या अनुषंगाने अध्यक्षांनी वेळेवरचा विषय ठेवला होता. मात्र यावरचर्चा करण्याकरिता स्वतंत्र बेठकलावण्याची मागणी विरोधकांनी रेटली अखेर अध्यक्षांनी त्यांची मागणी मान्य करित स्वतंत्र बैठकीला परवानगी दिली. सोबतच काही कंत्राटी कर्मचारी भरती आणि त्यांच्या वेतना बाबतच्या मद्यावर चर्चा करण्याकरिता स्वतंत्र बैठक विरोधकांनी आक्षेप घेतला होता. सदर विषय चर्चेनंतर मंजुर करण्यात आल्याची माहिती यावेळी उपाध्यक्ष अभिजित ढेपे यांनी दिली.–

# समाजशास्त्रज्ञ स्व. डॉ. एम. आर. देशमुख स्मृतिप्रीत्यर्थ वकृत्व स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती–** विद्यार्थ्यांचा सर्वागिण विकास साधण्यासाठी आणि व्यक्तीमत्व विकास साधण्यासाठी वकृत्व ही एक कला आहे. या कलेचा विकास व्हावा या हेतूने एज्युकेशन सोसायटी बेलोरा व्दारा संचालित चांदूर बाजार तालुक्यातील कारंजा बहिरम अंतर्गत येणाऱ्या बोदड येथे समाजशास्त्रज्ञ स्व.डॉ.एम.आर. देशमुख स्मृती प्रित्यर्थ जिल्हास्तरीय फिरता चषक वकृत्व स्पर्धा-२०२५चे आयोजन शनिवार, ८ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे.

या स्पर्धेचा विषय विद्यार्थ्याच्या सर्वागिण विकासाकरिता खेळाची उपयुक्तता, मी शेतकरी बोलतोयं, मोबाईल हटवा बालपण वाचवा, राष्ट्रनिर्माणासाठी युवकांची भूमिका, पर्यावरण संरक्षण व आव्हाने हे आहेत. ही स्पर्धा वर्ग ७ ते १० च्या विद्यार्थ्यासाठी आयोजित करण्यात आली असून स्पर्धक मराठी,



हिंदी, इंग्रजी या पैकी कोणत्याही भाषेचा उपयोग करू शकते. स्पर्धेसाठी प्रत्येक स्पर्धकाला पाच मिनिटाचाअवधी दिल्या जाईल. स्पर्धेचाअंतिम निर्णय परीक्षकांचा असेल,शाळेने कितीही स्पर्धक पाठविण्याचे बंधन राहणार नाही. विजेत्यांना फिरता चषक देण्यात येणार आहेत. पारितोषिक प्राप्त शाळेला मिळालेला फिरता चषक सुस्थितीत परत करण्यात यावा ही अट ठेवण्यात आली आहे. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक तीन हजार रुपये व फिरता चषक, ट्रॉफी, द्वितीय पारितोषिक दोन हजार रुपये व ट्रॉफी, तृतिय पारितोषिक एक हजार रुपये ट्रॉफी व प्रोत्साहनपर बक्षिस ५०० रुपये व ट्रॉफी असे देण्यात येईल. सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात येईल. याबाबत अधिक माहितीकरिता जी.एन. धोटे मो. ७६६६९७९००७, जी.के. कोल्हे मो. ९९२३९१०१०९ या वर संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# 'वंदे मातरम' गीत गायनासाठी दोन लाख नागरिक सज्ज




**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ यवतमाळ**

वंदे मातरम या गीताला ७नोव्हेंबरला १५० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने राज्य शासनाने वंदे मातरम या गीताच्या सामूहिक गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यासाठी शुक्रवारी यवतमाळातील स्टेडियमवर सामूहिक गीतगायन होणार आहे. जिल्ह्यात दोन लाख नागरिक एकाचवेळी गीतगायन करणार आहे. नेहरू


यवतमाळातील नेहरू स्टेडियमवर होणाऱ्या मुख्य कार्यक्रमाला १५ हजार नागरिक एकाचवेळी वंदे मातरम गीतगायन करणार आहेत. यासोबत १६ तालुक्यांत तालुका संकुल अथवा शाळांमध्ये हा गायनाचा कार्यक्रम पार पडणार आहे. तर गाव पातळीवर ग्रामपंचायती आणि पोलिस ठाण्यातही गीतगायन केले जाणार आहे.

राज्यातील प्रत्येक गावामध्ये, तालुक्यात आणि जिल्ह्याच्या ठिकाणी एकाचवेळी वंदे मातरम गीतगायन केले जाणार आहे. त्यासाठी ७ नोव्हेंबरला सकाळी ९:३० वाजता या कार्यक्रमाला प्रारंभ होणार आहे. तत्पूर्वी १५ मिनिटे आधीच या गीतगायनासाठी नागरिकांना पोहोचावे लागणार आहे. १०:३० वाजता वंदे मातरम गीताच्या गायनाला सुरुवात होणार आहे. जिल्ह्याच्या मुख्य कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी विकास मीना तर तालुक्यात तहसीलदार आणि गाव पातळीवर जिल्हा ग्रामविकास अधिकारी उपस्थित राहणार आहे.

# क्षयरोग निर्मूलनासाठी केलेल्या सर्व कामांची आकडेवारी तत्काळ द्यावी

## मनपायुक्तांचे आरोग्य विभागाला निर्देश, कामात कुचराई करणाऱ्यांना नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**



क्षयरोग (टीबी) मुक्त भारत अभियानांतर्गत ३१ ऑक्टोबरच्या आधी मनपा क्षेत्रात किती क्षयरुग्ण आहेत किंवा किती रुग्णांमध्ये लक्षणे आढळली. यासंदर्भात कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या. प्रत्यक्षात व खरेच किती काम झाले याबाबत शहरी आरोग्य केंद्रांनी नोंदी करणे अपेक्षित होते. त्या पूर्ण न झाल्याने मुदतवाढ देण्यात आली असून ७ नोव्हेंबरपर्यंत नोंदी पूर्ण करून त्या अद्ययावत कराव्यात. नोंदी अपूर्ण राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शहरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर असेल. त्यांना कामात कुचराई करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल. याची गंभीरतेने नोंद घ्यावी, असे निर्देश मनपा आयुक्तांनी आरोग्य विभागाला दिले आहेत.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अधिनस्त डीईओ, आशा सेविका, एएनएम, अटेंडंट यांच्याकडे काम विभागून देण्यात यावे. सर्व प्रलंबित नोंदी ७ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण कराव्यात. त्यानंतर आठवड्याचा एक दिवस निश्चित करून त्या दिवशी क्षयरोगाबाबत काम करावे. सर्व निदेशांची माहिती अद्ययावत करावी. एक्सरे तपासणीबाबत दररोज आरोग्य संस्था निहाय अहवाल वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे सादर करावा. तसेच आठवडी अहवाल आयुक्तांना सादर करावा. एक्सरेसाठी डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय तसेच खासगी वैद्यकीय व्यावसायिकांसोबत सामंजस्य करार करावेत, अशी सुचनाही मनपा आयुक्तांनी केली.

मनपा आयुक्तांच्या दालनात झालेल्या या बैठकीला अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.दिलीप सौंदळे, मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, शहरातील १३ ही शहरी आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे,एचडब्ल्यूसी दवाखाने, २३ ओपीडी रुग्णालयांचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. मनपाच्या आयसोलेशन दवाखान्यात फिक्स एक्स रे मशीन व फिरती एक्सरे मशीन वापरून क्षयरोगाबाबत तपासणी केली जात आहे.

शहरी आरोग्य केंद्रांमध्ये मायक्रोप्लॅन तयार करण्यात आला असून त्याअंतर्गत जोखीमग्रस्त लोकांना क्षयरोगाच्या स्क्रीनिंगची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. आरोग्य पथकांद्वारे नियमित क्षयरुग्णांना नियमित भेटी दिल्या जातील. औषधोपचारांचे पालन केले जाते की नाही याबाबत माहिती ठेवली जाईल. पोषण स्थितीचे मुल्यमापन करून निक्क्षय मित्रांमार्फत फुड बास्केट पुरवण्यात येईल.

जोखमीच्या गटातील नागरिक क्षय रोगासंदर्भात शहरातील ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, मधुमेहाचे रुग्ण, धुम्रपान करणारे, गेल्या पाच वर्षांत क्षयरोग झालेल्या रुग्णांचे कुटुंबिय, जवळचे नातेवाईक, बॉडी मास्क इंडेक्स १८ पेक्षा कमी असलेले, तसेच वृद्धाश्रमात राहणारे, विविध कामगार यांची जोखमीच्या गटातील नागरिकांमध्ये नोंद घेण्यात येणार आहे. या व्यक्तींची आशा सेविकांमार्फत यादी तयार केली जाणार आहे. तसेच शहराच्या एकूण लोकसंख्ये पैकी सुमारे १ लाख ४७ हजार ३०१ लोकांचे सर्वेक्षण केले जाईल. त्यानंतर १० लक्षणांवर आधारित स्क्रीनिंग केले जाईल. लक्षणे नसलेल्यांची मोफत तपासणी केली जाणार आहे. ज्यांच्यात क्षयरोगाची लक्षणे आढळली, त्यांच्यावर मोफत उपचार केले जातील.

# मुस्लिम बांधवांसाठी शादी खाना, भव्य पुतळा, पूल उभारणीसाठी खाजगी निधीचा संकल्प - आमदार संजय खोडके यांचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५दर्यापूर**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तर्फे दर्यापूर शहरात महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. राजपूतपुरा येथे झालेल्या या बैठकीस आमदार संजीवभाऊ खोडके, जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांसह राष्ट्रवादीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

बैठकीदरम्यान अमोल गहरवार यांनी शहराच्या विकास आराखड्याचा सविस्तर आढावा सादर करताना छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा, मुस्लिम बांधवांसाठी आधुनिक शादी खाना, मोठे कब्रस्तान आणि चंद्रभागा नदीवरील पूल उभारणीसारख्या प्रस्तावांची चर्चा केली.

या वेळी आमदार संजुभाऊ खोडके यांनी स्पष्ट केले की, मित्रपक्षांशी युती झाली नाही तरी राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर निवडणुकीच्या रिंगणात उतरेल. तसेच मुस्लिम बांधवांची दीर्घकाळची मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन देत ते म्हणाले, शादी खाना बांधण्यासाठी शासकीय निधी नसलातरी तो आम्ही खाजगी निधीतून उभारू.बैठकीदरम्यान ओपेरीस बायोटेक्नॉलॉजी व राष्ट्रवादी काँग्रेसच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या माती परीक्षण अभियानाचा शुभारंभही करण्यात आला. या उपक्रमाद्वारे शेतकऱ्यांना दोन मिनिटांत माती परीक्षणाची सुविधा दिली जाणार असून, याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.या बैठकीमुळे शहर विकास, शेती आणि सामाजिक क्षेत्रात नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# शुक्रवारी सिलिंडर गॅस डीलर्सचा संप



**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

घरपोच सेवा आणि प्रशासकीय शुल्कात ७५ रुपयांची वाढ करण्याच्या मागणीसाठी गॅस डीलर्स असोसिएशनने गेल्या काही दिवसांपासून आंदोलनात्मक भूमिका घेतली आहे. त्याचाच एक भाग म्हणून गुरुवार, ६ नोव्हेंबरला ते आपली मागणी नोंदवणार नाहीत. परिणामी शुक्रवारी ७ नोव्हेंबरला शहरात सिलिंडरचा तुटवडा जाणवून घरपोच वितरणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

यासंदर्भात अमरावती गॅस डीलर्स असोसिएशनने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले. या निवेदनानुसार घरपोच सेवा आणि प्रशासकीय शुल्कात वाढ ही मागणी गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार केली जात आहे. परंतु शासन त्याकडे लक्ष देत नाही. त्यामुळे देशभरातील गॅस वितरकांनी साखळीबद्द आंदोलनाची हाक दिली असून पहिल्या टप्प्यात गेल्या २४ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून काम करण्यात आले. त्यानंतर २९ ऑक्टोबरला काही ठिकाणी शासनाच्या निषेधस्वरुपात मेणबत्त्या पेटवून हा मुद्दा लोकदरबारात मांडण्यात आला. त्यानंतर आता ६ नोव्हेंबरला 'नो मनी, नो इंडेंट' ही भूमिका घेण्यात आली असून त्यादिवशी एकही वितरक त्यांच्याकडील बुकींग कंपनीला कळविणार नाही. परिणामी दुसऱ्या दिवशीचे वितरण अडचणीत येऊ शकते.

या आंदोलनाची माहिती जिल्हाधिकारी यांना देण्यात आली. यावेळी अमरावती गॅस डीलर असोसीएशनचे अध्यक्ष संजय देशमुख, सचिव अखिलेश यादव, कोषाध्यक्ष सागर राठी, कार्यकारिणी सदस्य राजेश डागा, बबलू शेखावत, किशोर भांबुरकर, मुफद्दल हसनजी व विलास तायवाडे यांच्यासह सचिन देशमुख, निखिल भन्साली, जितेश दम्मानी, यश राऊत, कपिल खेरडे, गजू राजगुरे, असलम सिद्दिकी, सुनील माळवे, उमेश झंगळे, प्रवीण वाडेकर, गिरीश राठी, ओमप्रकाश परतानी, निलेश रडके, मनोज कटारिया, जितेंद्र गोरे, कमलेश इवनाते, सतीश परदेशी, भावेश बावनकुळे, सारंग देशमुख, निखिल इंगळे, उमेश चव्हाण, रुपेश चौबे, मयुरी पटोकार, दीपक खंडारे आदी उपस्थित होते.

# गरीब भाजीविक्रेता ११ कोटींची लॉटरी जिंकला

## तिकीट खरेदी करायला उधारीने पैसे घेतलेल्या मित्राला देणार १ कोटी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.५जयपूर**

ते म्हणतात ना.. नशिब कधी, कुठे आणि कसे पालटेल ते सांगता येत नाही! राजस्थानातील एका साध्या भाजीविक्रेत्यासोबत हेच घडलं आहे. पंजाब राज्य लॉटरी-दिवाळी बंपर २०२५ मध्ये राजस्थानच्या कोटपुतळी येथील अमित सेहरा या भाजीविक्रेत्याने तब्बल ११ कोटी रुपयांची लॉटरी जिंकली आहे.

सेहरा यांनी आपल्या एका मित्राकडून पैसे उधार घेऊन पंजाबमधील बठिंडा येथील दुकानातून लॉटरी तिकीट विकत घेतले होते आणि हेच तिकीट त्यांच्या नशिबाला पालटणारं ठरलं आहे. लॉटरीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आणि ११ कोटी रूपये जिंकल्यानंतर आनंदाश्रूंनी डोळे भरून आलेल्या अमित यांनी सांगितले, माझ्याकडे तर चंदीगडला जाऊन बक्षीस घेण्याच्याही पुरेसे पैसे नव्हते. पण देवाने मला छप्परफाड बक्षीस दिलं आहे.

जयपूर जिल्ह्यातील कोटपुतली येथे ठेल्यावर भाजी विकून उदरनिर्वाह करणारे अमित म्हणाले, हा देवाचा आशीर्वाद आहे. हे पैसे मी माझ्या दोन छोट्या मुलांच्या शिक्षणासाठी वापरणार आहे. अमित यांनी सांगितले की, ज्यांच्या कडून त्यांनी लॉटरी तिकीट घेण्यासाठी पैसे उधार घेतले होते, त्या त्यांच्या मित्रा मुकेशला ते एक कोटी रुपये देणार आहेत, कारण त्यानेच मला या संधीपर्यंत पोहोचवले.

अमित यांनी दोन लॉटरी तिकीटं घेतली होती, एक स्वत:साठी आणि एक आपल्या पत्नीसाठी. त्यांच्या पत्नीच्या तिकिटाला १,००० रुपये मिळाले, तर अमित यांच्या तिकिटाने ११ कोटी रुपयांचा जॅकपॉट जिंकला. अमित सेहरा म्हणाले, या पैशातून मी माझ्या कुटुंबासाठी घर बांधणार आणि मुलांच्या उज्वल भविष्यासाठी गुंतवणूक करणार. पंजाब राज्य लॉटरीचा निकाल ३१ ऑक्टोबर रोजी जाहीर झाला.

# धर्मांतराच्या दबावामुळे किन्नर समाजातील सदस्याला मारहाण व जीवघेण्या धमक्या; संरक्षणाची केली मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील किन्नर समाजातील रेखा पडळीकर उर्फ गुड्डीबाई ग निभोरा यांनी स्वत:च्या सुरक्षेसाठी प्रशासनाकडे तातडीने संरक्षणाची मागणी केली आहे. रेखा यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांना रफीक उर्फ सोनाबाई साबनपुरा, छोटू उर्फ ममताबाई अकबर नगर आणि परवीन जान साबनपुरा या व्यक्तींनी वारंवार जीवघेण्या धमक्या दिल्या आहेत.रेखा या मागील २० वर्षांपासून किन्नर समाजात राहून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमधून मिळणाऱ्या मानधनातून करतात. तथापि, हिंदू धर्मीय असूनही त्यांच्यावर मुस्लिम धर्म स्वीकारण्याचा दबाव टाकण्यात आला होता. मार्च २०२५ मध्ये त्यांनी पुन्हा हिंदू धर्मात परतल्यावर परिस्थिती आणखी गंभीर बनली.रेखा यांनी आरोप केला आहे की, धर्मांतराला नकार दिल्याने आणि श्री श्री श्री १००८ नंदगिरी महामंडलेश्वर किन्नर आखाडामध्ये सामील झाल्याने, त्यांना धमक्या देण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे त्यांनी प्रशासनाकडे संरक्षण व न्यायाची मागणी केली आहे.

# काळवीट कातडी विक्री प्रकरणात चौघे पकडले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

वन विभागाच्या मुंबई येथील 'वाइल्ड क्राइम कंट्रोल युनिट' व स्थानिक वन विभागाच्या पथकाने मंगळवारी (दि. ४) शहर व जिल्ह्यात चौघांना पकडले आहे. हे चौघे काळविटाच्या कातडीची विक्री करणार होते, अशी माहिती पथकाकडे होती. त्या माहितीच्या आधारे ही कारवाई सुरू केली असून, मंगळवारी रात्री ११ पर्यंत सुरूच होती. वन विभागाचे मुंबईस्थित पथक अमरावतीत दाखल झाले आहे. त्यांनी स्थानिक पथकाच्या मदतीने अमरावती ते यवतमाळ मार्गावरील एका गावाच्या थांब्यावरून मंगळवारी सकाळी दोघांना ताब्यात घेतले. त्यानंतर सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास येथील मध्यवर्ती बस स्थानकापासून दोघांना पकडले. अशा पद्धतीने वन विभागाच्या पथकाने चौघांना पकडले आहे. त्यांचा काळवीट शिकार किंवा कातडी विक्री प्रकरणात सहभाग असल्याची माहिती वन विभागाकडे होती. मात्र या संदर्भात सविस्तर माहिती कारवाई पूर्ण झाल्यानंतर देणार, असे अमरावतीचे डीएफओ अर्जुन यांनी सांगितले आहे.

# सिंचन, पथदिवे, पुलाच्या मुद्द्यावरून आमदारांनी टोचले अधिकाऱ्यांचे कान

## जलसंपदा कार्यालयात विविध विभाग प्रमुखांची आढावा बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५चांदुर बाजार**




अचलपूर-चांदूर बाजारचे आ. प्रवीण तायडे यांनी मंगळवारी येथील जलसंपदा कार्यालयात विविध विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेतली. या वेळी सिंचन, शहरातील पथदिवे, ग्रामीण भागातील पूल व रस्ते आदींच्या अर्धवट कामकाजाची माहिती घेण्यात आली. आमदारांनी यावेळी बोलताना मतदारसंघात राहायचे असेल तर आलेल्या शेतकऱ्यांचे काम करून, समाधान करावेच लागेल, अशी ताकीद संबंधितांनी दिली आहे.

बैठकीला जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीकांत उमप, उपविभागीय अभियंता अनुप खवणे, प्रज्ज्वल वंजारी, कुलदीप गौरखेडे, भाजपचे पदाधिकारी मुरली माकोडे, विलास तायवाडे, मनीष नांगलिया उपस्थित होते. आ. तायडे यांनी यावेळी एक-एक करून शेतकऱ्यांच्या सर्व समस्या ऐकून घेत त्यावर काम न करणाऱ्या अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. कित्येक दिवसापासून शेतकऱ्यांनी अर्ज देऊनही अधिकाऱ्यांमार्फत त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. हा सर्व पाढा त्यांनी आमदारांसमोर मांडला. ही व्यथा ऐकताच आ. तायडे यांनी कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले. काम करायचे नसेल तर स्पष्ट सांगा, त्यांच्या रवानगीची व्यवस्था देखील आम्ही करू. दरम्यान मतदार संघात राहायचे असेल तर आलेल्या शेतकऱ्यांचे समाधान करून, त्यांची कामे करावीच लागेल, अशी सूचनाही केली.

शेतीसंबंधी काही शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. पिकांची नासाडी, अतिवृष्टीची न मिळालेली मदत, वन्यप्राण्यांचा त्रास, अनियमित वीज पुरवठा अशा अनेक समस्यांसोबत त्यांचा रोज संघर्ष सुरू आहे. वारंवार हे मुद्दे लक्षात आणून दिल्यानंतरही त्या शेतकऱ्यांच्या तक्रारींची संबंधित विभाग दखल घेत नाही. यासाठी ही आढावा बैठक घेण्यात आली होती.

# वर्ध्यात कार आणि कंटेनरचा भीषण अपघात
# २ फोटोग्राफरसह तिघांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५वर्धा**

वर्धा येथे भरधाव कंटेनर आणि कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. हा अपघात इतका भीषण होता की कारचा अक्षरश चक्काचूर झाला आहे. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे.तर तीन जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. ही घटना वर्ध्याच्या इव्हेंट मंगल कार्यालया जवळ घडली



आहे. मृतकांमध्ये एक वृद्ध महिला व पुरुषाचा समावेश आहे. या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन तपास सूरू केला आहे.

वर्ध्यातील पाच जण कौटुंबिक कार्यासाठी नागपूर येथे गेले होते. नागपूर येथून परत येत असताना वर्धेलगत ईव्हेन्ट मंगल कार्यालया जवळ कार वरील नियंत्रण सुटले आणि कार डिव्हायडर क्रॉस करून पलीकडच्या रस्त्यावर गेली. याच दरम्यान समोरून येणाऱ्या भरधाव कंटेनरने कारला भीषण धडक दिली.हा अपघात इतका भीषण होता की कारचा चक्काचूर झाला आहे.

या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये एक वृद्ध महिला व पुरुषाचा समावेश आहे. तर तीन जण गंभीर जखमी आहेत. या जखमींना तत्काळ स्थानिकांनी सावंगी मेघे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.त्यांच्यावर सध्या उपचार सूरू आहे. या अपघातातील मृत व्यक्ती आणि जखमी व्यक्ती एकाच कुटुंबातील असल्याची माहिती आहे. पण यातील मृत आणि जखमी यापैकी कोणाचीच नावे समारे आली नाही आहेत.

# श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या १८ शाळेमध्ये सुरू होणार कृत्रिम बुद्धिमत्ता अभ्यासक्रम
## ३१ शिक्षकांनी घेतले एआयचे ट्रेनिंग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या शाळेमध्ये लवकरच कृत्रिम बुद्धिमत्ता हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असून १८ शाळेमध्ये प्रायोगिक तत्त्वावर पाचवी ते बारावी करिता हा विषय सुरू करण्यात येणार आहे. ३१ शिक्षकांनी नुकतेच रयत शिक्षण संस्थेत पाच दिवसाचे – ख प्रशिक्षण घेतले आहे. या संदर्भात श्री शिवाजी शिक्षण संस्थेत आज नियोजन बैठक घेऊन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला.रयत शिक्षण शिक्षण संस्था, सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या ३१ शिक्षकांनी नुकतेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स ट्रेनिंग प्रोग्राम मध्ये सहभागी होऊन –ख प्रशिक्षण घेतले. सदर प्रशिक्षण झालेल्या शिक्षकांची बैठक घेऊन श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्यकारी परिषदेने आज त्यांचा आढावा घेतला. प्रशिक्षित शिक्षकांनी आपल्या शाळेतील इतर शिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्ता अभ्यासक्रमासाठी ट्रेनिंग देऊन –ख करिता नव्या शिक्षकांना तयार करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. याकरिता लागणाऱ्या सर्व सुविधा व सोयी श्री शिवाजी शिक्षण संस्था उपलब्ध करून देईल. प्रायोगिक तत्त्वावर सध्या हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असून शिक्षकांनी याकरिता पुढाकार घ्यावा व आपल्या सहकाऱ्यांना देखील प्रशिक्षित करावे असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी उपस्थित प्रशिक्षित शिक्षकांना केले. संस्थेचे उपव्यवस्थापक पंडित पंडागळे हे या उपक्रमाचे संस्थास्तरीय समन्वयक असून येत्याआठ दिवसात –ख उपक्रम संस्थेत सुरू करण्यात येणार आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मुख्य सभागृहात पार पडलेल्या सभेला संस्थेचे उपाध्यक्ष भैय्यासाहेब पाटील पुसदेकर, कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले, कार्यकारीनी सदस्य सुरेश दादा खोटरे, सचिव प्राचार्य वि.गो.ठाकरे,स्वीकृत सदस्य नरेशचंद्र पाटील, प्राचार्य अमोल महल्ले, सर्व शाळा तपासणी अधिकारी,व प्रशिक्षित शिक्षक यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# व्हीव्हीपॅट रद्द करून मताधिकार हिरावण्याचा प्रयत्न
## यशोमती ठाकूर यांचा सरकारवर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

मतदार यादीतील गोंधळ आणि ईव्हीएम मशीनमधील व्हीव्हीपॅट रद्द केल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी राज्य सरकार आणि भाजपवर जोरदार टीका केली. मतदार यादी दुरुस्त होणे आवश्यक असल्याचे सांगत, लोकशाहीचा आणि संविधानाने मिळालेला मतदानाचा अधिकार हिरावून घेण्याचा हा प्रकार आहे, असे त्यांनी सांगितले.

जिथे मतदान दिलं ते मत योग्य ठिकाणी जात आहे का हे



आम्हाला माहिती व्हायला हवं. व्हीव्हीपॅट रद्द करून हा अधिकार हिरावला जातोय. व्हीव्हीपॅटमध्ये चोरी होण्याची शक्यता असल्यानेच त्या वापरण्यात येत नाहीत, असा गंभीर आरोप त्यांनी केला.ग्रामीण भागातील अंतिम मतदार याद्यांमध्ये छायाचित्रेही नसल्याचे ठपके ठेवत त्यांनी सध्याच्या सत्ताधाऱ्यांवर डकेतच आहेत, मतं चोरूनच सत्तेत येतात, अशी घणाघाती टीका केली.जनता मूर्ख नाही. हा हक्क हिरावला गेला तर जनता रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही ठाकूर यांनी दिला.

# मतदार याद्यांवरील आक्षेप निवडक ठिकाणीच
## भाजपा आमदार प्रताप अडसड यांचा महाविकास आघाडीवर पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५अमरावती**

अमरावती जिल्ह्यात मतदार यादीतील अनियमिततेवरून महाविकास आघाडीने केलेल्या आरोपांवर भाजपाचे आमदार प्रताप अडसड यांनी जोरदार प्रतिउत्तर दिले आहे. त्यांनी सवाल केला की, ज्यावेळी लोकसभेची निवडणूक झाली तेव्हा महाविकास आघाडीने ऑब्जेक्शन का घेतले नाही? तेव्हा मतदार याद्यांमध्ये घोळ नव्हता का?



अडसड यांनी स्पष्ट केले की, जिथे काँग्रेस किंवा महाविकास आघाडीचे नेते जिंकतात, तिथे मतदार यादी योग्य वाटते, परंतु जिथे पराभव होतो तिथेच घोळ असल्याचा आरोप केला जातो. त्यांच्या निष्क्रियतेमुळेच त्यांना पराभव पत्करावा लागतो.त्यांनी पुढे असा गंभीर सवाल उपस्थित केला की, मुस्लिम बहुल भागांमध्येही मोठ्या प्रमाणात मतदार याद्यांमध्ये दुबार नावे आहेत, मग त्या ठिकाणी महाविकास आघाडी का बोलत नाही? काँग्रेस आणि आघाडीने मतदार यादीवर कधीही गंभीरपणे काम केले नाही, म्हणूनच त्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, असे टीकास्त्र अडसड यांनी सोडले.

# अमरावतीत पहिल्यांदाच ‘पौधों का लंगर’ उपक्रम
## गुरुद्वारा गुरु सिंह सभेत अनोखी पर्यावरणसेवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ५ अमरावती**

शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक देवजी यांच्या ५५६ व्या जयंतीनिमित्त अमरावती शहरातील राजापेठ परिसरातील गुरुद्वारा पूर्वसंध्येला दिव्यांनी उजळून निघाला तर आज अमरावती शहरात पहिल्यांदाच एक अनोखा आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविला जात आहे. गुरुद्वारा गुरु सिंह सभा, अमरावती येथे ५ नोव्हेंबर २०२५ रोजी पारंपरिक ‘लंगर’ सोबतच ‘पौधों का लंगर’ सोबत रक्तदान आयोजित करण्यात आले या उपक्रमाद्वारे प्रत्येक भेट देणाऱ्या भक्ताला मोफत रोप देण्यात आले, एक पौधा लगाएँ – जीवन बढ़ाएँ! हा संदेश देत पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्यात येणार आहे.गुरुद्वारा कडून राबविण्यात येणारा हा उपक्रम पर्यावरण जतनाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, सर्व नागरिकांनी यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अमरावतीत पहिल्यांदाच अशा प्रकारचे ‘पौधों का लंगर’ असल्याने भक्तांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.







# समृद्धी महामार्गावर १५०० सीसीटीव्ही कॅमेरे; नागपूर ते मुंबईपर्यंत ‘हायटेक वॉच’, अपघात व वेगमर्यादा नियंत्रणात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

राज्यातील एक महत्त्वाचा आणि वेगवान दळणवळण मार्ग ठरलेल्या समृद्धी महामार्गावर सुरक्षा आणि नियंत्रण आणखी सक्षम करण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. नागपूर ते मुंबई या ७०१ किमी लांबीच्या समृद्धी महामार्गावर तब्बल १५०० उच्च तंत्रज्ञानयुक्त सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम जलद गतिने सुरू आहे. हे कॅमेरे फक्त वेग नियंत्रणासाठीच नाहीत तर अपघातस्थळांचे



लोकेशन त्वरित समजावे, चोरीच्या घटना रोखाव्यात आणि वाहनवाहतुकीची देखरेख करावी या उद्देशाने बसवले जात आहेत.

या प्रकल्पाचे काम दिल्ली स्थित ’एनसीसी’ या कंपनीकडे सोपविण्यात आले आहे. महामार्गावरील प्रत्येक २ किमीवर एक सीसीटीव्ही कॅमेरा बसविला जाणार असून, एका कॅमेऱ्याची मर्यादा ५०० मीटर पुढे, ५०० मीटर मागे आणि बाजूला २०० मीटरपर्यंत राहणार आहे. यामुळे दोन्ही दिशांना व्यापक निरीक्षण ठेवणे शक्य होणार आहे. महामार्गावरील अपघात घडल्यास कंट्रोल रूममध्ये ते ठिकाण नेमके ओळखता येणार असून, त्वरित मदत पोहोचविली जाईल.

समृद्धी महामार्गावर सध्या दरमहा सुमारे ३ लाख लहान–मोठी वाहने धावत असून, १२० किमी प्रतितास वेगमर्यादा असलेल्या या रस्त्यावर अपघातांच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे या सुविधा आवश्यक ठरत आहेत. नागपूर ते वाशिमदरम्यान काही प्रमाणात कॅमेरे बसविण्यात आले असून, लवकरच संपूर्ण मार्गावर हे यंत्रणात्मक जाळे तयार होणार आहे. मुंबई येथे मुख्य कंट्रोल रूम स्थापन केले जाणार असून, यात ’एआय’च्या मदतीने वाहनांची पाहणी आणि अपघातस्थान शोधणे अधिक सुलभ होईल.

# नितीन गडकरी म्हणाले, देशाला आज निर्भीड व बेधडक पत्रकारांची गरज, अन्यथा लोकशाही..

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५ नागपूर**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना पुन्हा एकदा आपल्या भाषणात प्रसार माध्यमांविषयी बेधडक वक्तव्य केले आहे. देशातील प्रसार माध्यमांवर विविध प्रकारची टीका होत असतानाच गडकरींनी पुन्हा एकदा माध्यमांना आरसा दाखवला आहे. देशासमोर विचारभिन्नता ही समस्या नाही. पत्रकारांमध्ये निर्माण होत असलेली विचारशून्यता लोकशाहीसाठी घातक आहे. आज देशाला निर्भिड आणि बेधडक पत्रकारांची गरज आहे, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. नागपूरमध्ये ‘एस. एन. विनोद – ८५ वर्षांची अनंत यात्रा’ या स्मारिकेचे प्रकाशन आणि सत्कार सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून गडकरी बोलत होते.



एस. एन. यांच्या बेधडक पत्रकारितेचे कौतूक करताना गडकरी म्हणाले, आणीबाणीच्या काळात विनोदजी यांनी आपल्या संपादकीय लेखांमधून सरकारविरुद्ध बिनधास्त मतप्रदर्शन केले. त्यांनी ‘ बरोबर ते बरोबर आणि चुकीचे ते चुकीचे’ असे ठामपणे मांडत त्यांनी सरकारला आरसा दाखवला. लोकशाही बळकट करण्यासाठी पत्रकाराचे हेच मुळ कर्तव्य आहे. आज देशाला निर्भींड आणि बेधडक पत्रकारितेची गरज आहे, असे गडकरी म्हणाले. सोशल मीडियावरून स्तुतीसुमने उधळली जातात, तशीच कठोर टीका देखील होत असते.

केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी हे सोशल मीडियावर लोकप्रिय असलेले नेते आहेत. मात्र, मागील काही दिवसांपापूर्वी त्यांच्यावर टीकेचे बाण सोडले जात आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सोशल मीडियावर सुरू असलेल्या टीकांवर गंभीर आरोप केला आहे. ई-२० म्हणजेच २० टक्के इथेनॉल मिश्रित इंधनाच्या वापराबाबत गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर नकारात्मक मोहिम राबवली जात आहे.

ही मोहीम फक्त इथेनॉलविरोधी नसून, मुद्दाम पैसे खर्च करून माझ्याविरुद्ध चालवली जात आहे, असे गडकरी म्हणाले होते. त्यानंतर नागपूरमध्ये नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात गडकरींनी पुन्हा एकदा प्रसार माध्यमांना आरसा दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. या कार्यक्रमात गडकरींनी देशाला आज निर्भिड पत्रकारांची गरज असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी पत्रकारितेमध्ये काम करणाऱ्या विविध लोकांची उदाहरणे दिली. तसेच आणिबाणीच्या काळातही काही पत्रकारांनी अशाप्रकारे जोखमीचे काम केले याची माहिती दिली.

# गवळीपुरा येथे अवैधरित्या गोवंश कत्तल; ११ हजारांचा मुद्देमाल जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

आज शहरातील गवळीपुरा परिसरात मोठी कारवाई करण्यात आली. मोहम्मद नईम मोहम्मद याकूब कुरेशी (वय ४८ वर्षे, रा. गवळीपुरा) याने अवैधरीत्या गोवंश कत्तल करून गोमांस विक्रीकरिता साठवून ठेवल्याची माहिती मिळताच नागपुरी गेट पोलिसांनी धाड टाकली असता या कारवाईदरम्यान त्याच्याकडून अंदाजे ११,००० रुपयांचा गोमांस व संबंधित साहित्याचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी या प्रकरणी कलम ३२५ भारतीय दंड संहितेअंतर्गत तसेच कलम ५, ५(क), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण व सुधारणा अधिनियम १९७६ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास नागपुरी गेट पोलिस स्टेशनकडून सुरू आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत